18

# राज्याचे राजकारण आणि राज्यपाल

डॉ. डोंगरे एल. बी.
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय हिमायतनगर, जि. नांदेड

भारताने संसदिय शासन पध्दतीचा स्विकार केला आहे. केंद्राप्रमाणे राज्यातही एक घटनात्मक नामधारी शासन प्रमुख आणि एक वास्तविक शासन प्रमुख असतो. राज्याचे राज्यपाल हे राज्याचे घटनात्मक आणि नामधारी शासन प्रमुख असतात. भारतीय राज्यघटनेच्या कलम १५३ नुसार राज्यपाल हा राज्याचा घटनात्मक प्रमुख असतील अशी तरतुद आहे. राज्यपालाने केंद्र आणि राज्यामध्ये दुवा म्हणुन काम करावे. संघात्मक शासनव्यवस्था मजबुत व्हावी हा त्यामागे हेतु होता. परंतु वास्तवात राज्यपाल हे पद निर्मितीपासूनच वादग्रस्त बनले आहे. राज्यपालाची नियुक्ती ते पदच्युती, राज्यपालाची राजकीय भुमिका, राज्यपालांचे निर्णय यामुळे राज्यपाल हे पद चर्चेचा विषय बनला आहे. राज्यपाल पदाशी संबंधित घटनात्मक तरतुदीचा आपल्या सोयीप्रमाणे त्याचा अर्थ लावल्यामुळे राज्यपाल हे पद जास्तच वादग्रस्त बनले आहे. त्यामुळे राज्यपालाशी संबंधित सर्व बाबींचा उहापोह होणे आवश्यक वाटते. त्यामध्ये राज्यपाल पदाबाबत घटनात्मक अस्पष्टता आहे काय ? केंद्रातील सरकारांनी आपल्या अधिकाराचा गैरवापर केला आहे का ? राज्यपाल ही व्यक्ती राजकीय असावी की अराजकीय असावी. राज्यपाल पदावरील व्यक्तीनेच घटनात्मक मर्यादांचा भंग केला आहे का ? केंद्राने राज्यातील विरोधी पक्षाचे सरकार असल्यामुळे केंद्राने राजकीय अभिनिवेशातून केंद्राने राज्याच्या राजकारणात ढवळाढवळ केली आहे का ? या सर्व प्रश्नांचे विश्लेषण होणे आवश्यक आहे.

३१ मे १९४९ रोजी राज्यपालाविषयीची कलमे स्वीकृत करण्यात आली. राज्यपालाची निवडणूक व्हावी की नियुक्ती यावर चर्चा करतांना नेहरुंनी निवडणूकीला विरोध करुन नियुक्तीचा पर्याय स्विकारण्यात आला. ही नियुक्ती केंद्र सरकारकडून करण्यात यावी हे निश्चित करण्यात आले. राज्यपाल हे पद प्रतिष्ठेचे व

सन्मानाचे आहे. १९५६ च्या घटना दुरुस्तीने राज्यपाल हा दोन किंवा त्यापेक्षा अधिक राज्याचा राज्यपाल राहील अशी तरतुद करण्यात आली. राज्यपाल पदाच्या निर्मितीपासून केंद्र सरकारने राज्यपाल पदाचा आपल्या राजकीय सोयीसाठी त्याचा गैरवापर केल्याचे दिसून येते. भारताच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी राज्यपाल पदाचा सर्वाधिक गैरवापर केल्याचे दिसून येते. आतापर्यंत भारतात एकशे सव्वीस वेळा घटनात्मक आणिबाणी लागू करण्यात आली. परंतु घटनात्मक आणिबाणीचा राज्यपालांचा अहवाल हा घटनात्मक भुमिकेतून नाही तर ते पक्षीय भुमिकेतून तसा अहवाल देवून राज्यामध्ये राष्ट्रपती राजवट लागू करुन राज्याच्या राजकारणात केंद्राला हस्तक्षेप करण्याची संधी या माध्यमातून राज्यपालांनी उपलब्ध करुन दिली. म्हणुन राज्यपालांनी आपले अधिकार व कर्तव्य बजावत असतांना घटनात्मक चौकटीत राहून काम करण्याऐवजी घटनात्मक मर्यादांचे उल्लंघन केल्याचे दिसून येते.

राज्याच्या राज्यपालाचे अस्तित्व केंद्रातील सत्तेवर अवलंबून असते. केंद्रात सत्ता परिवर्तन झाले की राज्यातील राज्यपालाची उचलबांगडी केली जाते. २००४ मध्ये रालोआ सरकारने नेमलेले सर्व राज्यपाल संपुआ सरकारने बदलले २०१४ मध्ये संपुआ सरकार गेले आणि भाजपा सरकार केंद्रामध्ये सत्तेवर आरुढ झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संपुआ सरकारच्या काळातील नियुक्त सर्व राज्यपालांना सक्तीने राजीनामे देण्यास भाग पाडले. २०१४ पासून भाजपा सरकारने नियुक्त केलेले राज्यपाल सर्व राज्यामध्ये आहेत.

राज्यपाल पदी विराजमान होणारी व्यक्ती ही अराजकीय असावा असा घटनात्मक संकेत आहे. तरी पण केंद्रातील सत्ताधारी पक्ष प्रशासकीय क्षेत्रातील गुणवंत, कायदेतज्ज्ञ, ज्ञानी अनुभवी व्यक्तीची राज्यपाल पदी नियुक्ती करीत नाहीत तर आपल्याच पक्षातील जेष्ठ अनुभवी सार्वत्रिक निवडणूकीत पराभूत उमेदवाराचे राजकीय पुनर्वसन करण्यासाठी अशा लोकांना राज्याचे राज्यपाल केले जाते. हा भारताचा इतिहास साक्ष आहे. केंद्रातील सत्ताधारी आणि राज्यातील विरोधी पक्षाचे सरकार असल्यास केंद्र सरकारने आपल्या घटनात्मक अधिकाराचा गैरवापर केल्याचे दिसून येते. इंदिरा गांधी आंध्रप्रदेश, अटल बिहारी वाजपेयी यांनी बिहार या राज्यात राज्यपालाच्या माध्यमातून कलम ३५६ चा गैरवापर केल्याचे दिसून येते. अर्थात काँग्रेस आणि भाजपा पक्षाच्या सरकारांनी राज्यपाल पदाचा गैरवापर केल्याचे दिसून येते. राज्यातील विरोधी पक्षाच्या सरकारमध्ये राज्यपालाच्या माध्यमातून केंद्रातील सरकारांनी राजकारणात ढवळाढवळ केल्याचे दिसून येते.

राज्यपालाची निवड यापेक्षा राज्यपालाने राज्यातील सरकार स्थापनेत घेतलेल्या भुमिकांचे अध्ययन केल्यास असे दिसून येते की राज्यातील राज्यपालांनी सरकार स्थापनेत केंद्र सरकारच्या इशाऱ्यावर काम आणि निर्णय घेतल्याचे दिसून येते. कर्नाटक राज्यात काँग्रेस आणि जे.डी.एस.सरकारला स्पष्ट बहुमत असतांना बहुमत नसलेल्या भाजपाच्या बि.एस.येदियुरप्पा यांना सरकार स्थापनेचे आमंत्रण राजभवनाकडून देण्यात आले. काँग्रेस व जे.डी.एस.ने राज्यपालांच्या घटनाविरोधी भुमिकेच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. सदरील याचीकेवर सर्वोच्च न्यायालयाने सुनावणी करतांना आठ दिवसाच्या आत बहुमत सिध्द करण्याचे निर्देश दिले होते. परंतु बि.एस.येदियुरप्पा यांच्याकडे स्पष्ट बहुमत नसल्यामुळे बहुमत सिध्द करण्यापुर्वीच त्यांनी मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिला. त्यानंतर काँग्रेस जे.डी.एस.चे कुमारस्वामी यांचे सरकार स्थापन झाले. याचेच पुनरावृत्ती महाराष्ट्राच्या राज्यपालांनी केली हे सर्वज्ञात आहे. यावरुन हे स्पष्ट होते की राज्यपाल पदावर विराजमान व्यक्तीने आपल्या अधिकाराचा आणि घटनात्मक मर्यादांचे उल्लंघन केल्याचे दिसून येते. म्हणुन राज्यपालांनी राज्यात सरकार स्थापन करीत असतांना पक्षीय भुमिका न घेता घटनात्मक चौकटीत राहून आपल्या अधिकाराचा वापर केल्यास राज्याच्या राजकारणात घटनात्मक पेचप्रसंग निर्माण होणार नाहीत.

विधानसभा निवडणूकीत सर्वाधिक आमदार नसलेल्या राजकीय पक्षाला सत्ता स्थापन करण्यासाठी पाचारण करणे संवैधानिक नैतिकतेचा भाग म्हणुन अयोग्य आहे. अशा प्रकारे सत्ता स्थापन करण्यासाठी पाचारण करणे म्हणजे फोडाफोडी आणि घोडे बाजाराला अनुकूल वातावरण निर्माण करण्यासारखे आहे. हे राज्यपालासारख्या संविधानाच्या रक्षकाकडून असे कृत्य घडणे दुर्दैवी आहे. म्हणुन राज्यपालाची भुमिका निस्पृह पक्षनिरपेक्ष असावी अशी अपेक्षा संविधानाला अभिप्रेत आहे. राज्यपालांनी राज्यात आपल्या अधिकाराचा वापर करतांना पक्षनिष्ठेऐवजी संविधाननिष्ठा बाळगून जबाबदारीने आपल्या घटनात्मक अधिकाराचा वापर केल्यास राज्याच्या राजकारणात ढवळाढवळ होणार नाही. राजकीय पेच प्रसंग, राजकीय अस्थिरता निर्माण होणार नाही. याची काळजी घेवून आपल्या अधिकाराचा व कर्तव्याचा वापर केल्यास जबाबदार शासन सुशासन निर्माण होण्यास मदत होईल. घटनाकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना राज्यपाल हे पद केंद्र आणि राज्यात समन्वय घडवून आणण्याची भुमिका बजावेल अशी अपेक्षा होती. परंतु राज्यपालाचे अधिकार एक वादग्रस्त विषय बनला आहे.